माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## व्दितीय अपील क्रमांक ३४१८/२०१८

हेमंतकुमार रामभाऊ आरु,
मु.पो.रिठद, ता.रिसोड, जि.वाशिम

अर्जदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत रिठद, ता.रिसोड, जि.वाशिम

उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती रिसोड,
ता.रिसोड, जि.वाशिम

| **उपस्थिती**: सुनावणी दिनांक ०८.०६.२०२२ | व्यक्तीशः/ प्रतिनिधी | नांव |
|---|---|---|
| अर्जदार | व्यक्तीशः | हेमंतकुमार रामभाऊ आरु |
| | प्रतिनिधी | ॲड.डी.एन.साधवानी<br>ॲड.के.बी.जसवानी<br>वकालतनामा दि.०८ जुन २०२२ |
| प्र.अ.अ. | प्रतिनिधी | गणेश उत्तमराव झाटे, सहाय्यक प्रशासन अधिकारी<br>प्राधिकार पत्र दि.०७.०६.२०२२ |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता ज.मा.अ. तथा प्रथम अपिलीय अधिकारी करिता प्र.अ.अ.

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा

दिनांकः ०८ जुन २०२२

## आदेश

१. अर्जदार यांनी माहितीकरिता त्याचे अर्जावर जन माहिती अधिका-याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे कळवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) खाली दाखल केले द्वितीय अपिलावर आयोगानी चौकशी व सुनावणी करण्याचे ठरविले.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

| | |
|---|---|
| माहितीचा अर्ज /दाखल दिनांकः | ३१.०७.२०१८ |
| ज.मा.अ. यांचे उत्तराचा दिनांकः | - |
| प्रथम अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | १७.०९.२०१८ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दिनांकः | - |
| द्वितीय अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | २४.१२.२०१८/२६.१२.२०१८ |
| प्र.अ.अर्ज पासून दिवसः | १०० ; द्वितीय अपिल विहित वेळेत सादर केले |
| सुनावणी सूचना (नोटिस) दिनांकः | १७.०५.२०२२ |

२. अर्जदार यांनी मागितलेली माहितीचे वर्णन (जोडपत्र अ):

माहितीचा विषयः मुद्दा क्र.१. दि.२५.०६.२०१८ ला दिलेल्या अर्जदाराच्या अर्जानुसार ग्रामसेवक रिठद यांनी केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल साक्षांकित प्रत देणे.

मुद्दा क्र.२. ग्रामपंचायत रिठदला सन २०१० पासुन शासकीय विविध योजनासाठी आलेल्या निधीचे विवरण व खर्चाचे विवरण वर्षनिहाय प्रत साक्षांकित देणे व मान्य झालेल्या इस्टीमेटची प्रत देणे (साक्षांकित)

मुद्दा क्र.३. दि.०१.०१.२००२ ते ०१.०७.२०१८ पर्यंत झालेले ग्रामपंचायत रिठदचे संपुर्ण ठराव साक्षांकित देणे.

मुद्दा क्र.४. सन २००७ पासुन ते आजपर्यंत संपुर्ण स्वच्छता अभियानाअंतर्गत शौचालय वाटप यादी साक्षांकित.

३. अर्जदार यांनी व्दितीय अपिल दाखल करण्याचे प्रयोजन पुढील प्रमाणे दिले आहेः

"दि.३१.०७.२०१८ ला प्रपत्र अ RTI दाखल केला त्यानुसार विहीत कालावधीत माहिती अथवा सुचना मिळाली नाही. त्यामुळे दि.१७.०९.२०१८ ला गटविकास अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिल टपालाने दाखल केली परंतु सुनावणी घेण्यात आली नाही त्यामुळे RTI कलम २०(१), (२) नुसार कार्यवाही अपेक्षीत."

४. वर नमुद सूचनेद्वारे सर्व संबंधितांना व्दितीय अपिल अर्जाबाबत त्यांचे म्हणणे लेखी सादर करण्यास संधी देवून सुनावणीचा दिवस कळविण्यात आला. प्र.अ.अ.यांनी सादर करावयाचे प्रपत्र त्यांचे प्रतिनिधी यांनी त्यांचे स्वाक्षरीने सादर केले आहे. अर्जदाराने माहिती बाबत प्रपत्र सादर केले आहे.

५. अर्जदाराने लेखी व समक्ष कळविले की, माहिती आजपर्यंत मिळाली नाही.